आर.सी. एस.क्र. २६/२०१९.
गूलचंद वि. आप्पा व इतर
नि. क्र. ४३ लगत.

**साक्ष शपथेवर सुरु**

**प्रतीवादींचा साक्षीदार क्र. १ चा उलट तपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एन. बादुले यांच्या मार्फत**

३. मी वादीची मामी आहे. मी अशिक्षीत आहे. प्रतीवादी क्र. १ च्या हक्कात करुन दिलेले बक्षीसपत्र मी अभिलेखावर दाखल केले आहे. **(अभिलेखाची पाहणी केली असता अभिलेखावर बक्षीसपत्र दाखल नाही).** सदर बक्षीसपत्र मी दाखल करु शकत नाही. सदर बक्षीसपत्र मी करुन दिल्याची तारीख व वर्ष मला सांगता येत नाही. सोनाबाई नरहरी सुपते यांना मी ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, सोनाबाई सुपते हिच्याकडून मी गट क्र. ५३८ मध्ये ०२ हे ५५ आर जमीन खरेदी घेतली आहे.
**प्रश्न —** गट क्र. ५३८ चा फेरफार नोंद करत असताना वादीच्या दावा मिळकतीची नोंद तुमच्या नावे करुन घेतली.?
**उत्तर—** वादीने दावा मिळकत मला करुन दिली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर आमचा केंव्हाही ताबा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती मधुन पवन चक्कीचे पोल लावलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर पोल बाबत मावेजा रक्कम म्हणून रुपये २८,०००/— वादीस मिळाले होती. हे म्हणणे खरे आहे की, पवन चक्कीचे पोल लावण्यासाठी पवन चक्कीचे लोक तेथे आल्यानंतर मी त्यांना अडविले होते.

५. सदर बक्षीसपत्र हे निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेले आहे. बक्षीसपत्र नोंदणीकृत करत असताना किती स्टॅम्प डयूटी भरली होती हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतीवादी क्र. १ च्या नावे कोणतेही बक्षीसपत्र करुन दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ गट क्र. ५३८ चा फेर नोंद करत असताना तलाठयाशी संगनमत करुन दावा मिळकतीची नोंद करुन घेतली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर माझा व माझ्या मुलाचा केंव्हाही ताबा नव्हता व आज देखील ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीची जमीन बळकवण्याच्या उददेशाने आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मला पवन चक्कीचे पोल गेल्या बद्दल मावेजा रक्कम मिळाल्याचे कागदपत्र मी न्यायालयात दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा असुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Shyam Shrinivas Kalaskar
Digitally signed by Shyam Shrinivas Kalaskar
Date: 2024.06.25 16:41:51 +0530

(एस.एस.कळसकर)

दिनांक २५/०६/२०२४. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, लोहारा.